# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०७/२०१५**

**सायं ४.०० वा.**

| अनु. क्र. | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | प्रश्नोत्तरे | निरंक<br>अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| २ | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. एम.सी.ओ.- २०१५/प्र.क्र.९९/न.वि. १४ दिनांक ०७/०४/२०१५<br>अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ३ | मा. परिवहन समिती सदस्य श्री कमळाकर अनंत पाटील यांनी दिलेल्या राजीनाम्याने रिक्त झालेल्या जागेबाबत. | **ठराव :-** वरील प्रस्तावात नमुद केल्यानुसार श्री. कमळाकर अनंत पाटील ह्यांनी परिवहन समिती सदस्य पदाचा राजीनामा पुर्वलक्षी प्रभावाने मान्य करणेत येत आहे. तसेच महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुकीनंतर समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करतांना नव्याने महानगरपालिका मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून रिक्त पदांवर यथोचित अर्हता प्राप्त व्यक्तींची नेमणुक प्रशासनामार्फत करणेस याद्वारे मान्यता प्रदान करणेत येत आहे.<br>अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ४ | मा. परिवहन समिती सदस्य श्री प्रविण चिन्नया शेट्टी यांनी दिलेल्या राजीनाम्याने रिक्त झालेल्या जागेबाबत. | **ठराव :-** वरील प्रस्तावात नमुद केल्यानुसार श्री. प्रविण चिन्नया शेट्टी ह्यांनी परिवहन समिती सदस्य पदाचा राजीनामा पुर्वलक्षी प्रभावाने मान्य करणेत येत आहे. तसेच महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुकीनंतर समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करतांना नव्याने महानगरपालिका मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून रिक्त पदांवर यथोचित अर्हता प्राप्त व्यक्तींची नेमणुक प्रशासनामार्फत करणेस याद्वारे मान्यता प्रदान करणेत येत आहे.<br>अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ५ | श्री. पी.एच.भुरे, आरोग्य निरीक्षक हे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था | **प्रस्तावाचा निर्णय :-** श्री. परवेज भुरे, आरोग्य निरीक्षक, वसई-विरार शहर महानगरपालिका हे माहे सप्टेंबर १९९७ मध्ये एल.एस.जी.डी. उत्तीर्ण झाले आहेत. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक पीएमसी |

| | | |
|---|---|---|
| | **यांचेकडील एल.एस.जी.डी. उत्तीर्ण झालेबाबत एक जादा वेतनवाढ देवून सुधारीत वेतनश्रेणी निश्चित करणेबाबत.** | ३००६/२५२७/प्र.क्र.२६/०७/नवि.२२, दिनांक १५ मे २००८ अनुसार एल.एस.जी.डी. पदविका उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांना एक वेतनवाढ देय आहे. त्यानुसार श्री. परवेज भुरे, आरोग्य निरीक्षक, यांना एल.एस.जी.डी. पदविका उत्तीर्ण झालेचे दिनांकापासून एक जादा वेतनवाढ मंजूर करुन सुधारीत वेतन निश्चिती करुन त्याप्रमाणे होणाऱ्या फरकाची रक्कम अदा करणेस ही सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ६ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समित्यांकडून देण्यात येणाऱ्या मालमत्ता कर उतारा थकबाकी नसल्याचा दाखला मालमत्ता हस्तांतरण वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण इत्यादींसाठी आकारण्यात येणाऱ्या फी च्या दरात एक सुसुत्रतता आणण्याच्या दृष्टीने फी चे समानीकरण करणे बाबत.** | **ठराव/निर्णय :-** प्रशासनाच्या प्रस्तावावर विचारविनिमय करण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५, दि. २५ एप्रिल, २०१५ व नगर विकास विभाग, शासन निर्णय, दि. २३ जुन, २०१५ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार जाहीर करावे लागणारे दाखला फी चे दर तसेच महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या भुतपूर्व नगरपालिका व ग्रामपंचायत हद्दीत दाखला/परवानगी इत्यादीसाठी सध्या आकारण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या फी चे दरात समानीकरण व एकसुत्रता आणण्याची आवश्यकता, या बाबीं विचारात घेऊन संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी खाली नमूद केलेले सुधारित फी चे दर लागू करण्यास महासभेची मान्यता देण्यात येत आहे. |

| अ.क्र | दाखल्याचा प्रकार | फी चे प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | विहित नमुन्यातील अर्ज | विनामुल्य |
| २ | पेपर नोटीस प्रसिध्दी खर्च | रु. ४००/- |
| ३ | मालमत्ता कर उतारा देणे | रु. ५०/- |
| ४ | थकबाकी नसल्याचा दाखला देणे | रु. ५०/- |
| ५ | अ) दस्ताऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण करणे. | १) विकासकाच्या/बिल्डर्सच्या नावावरुन रहिवास, वाणिज्य व औद्योगिक अशी कोणतीही मालमत्ता प्रथम खरेदीदाराच्या नांवे हस्तांतरीत करण्यांस फी आकारण्यात येणार नाही.<br>२) त्यापुढील मालमत्ता हस्तांतरणासाठी प्रति चौ.फु. रु. २/- रहिवास, रु. ४/- वाणिज्य व रु. ५/- औद्योगिक याप्रमाणे फी चे दर आकारण्यात येतील. |
| | ब) मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र. | रु. ५०/- |
| | क) दस्ताऐवजाच्या आधारे वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण करणे. | १) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरणासाठी रु. ५००/- रहिवास, रु. १००० वाणिज्य व रु. १५०० औद्योगिक |

| | | |
|---|---|---|
| | | याप्रमाणे फी चे दर आकारण्यात येतील. |
| | ड) वारसा हक्काने झालेली मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र | रु. ५०/- |
| ६ | धनादेश न वटल्यास (Cheque bounced) | रु. २००/- |
| ७ | जप्त केलेली मालमत्ता (Seal of Property) | रु. ५००/- |

उपरोक्त सुधारित फी चे दर त्वरीत लागु करावेत.

अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - सुदेश चौधरी

ठराव सर्वांनुमते मंजुर